# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्रनिकेतन परिसर,मंगळवारी बाजार सदर, नागपूर
(ISO 9001 : 2008)
दुरध्वनी क्रमांक: २५६५१४३ E-mail : ronagpur.dte@gmail.com फॅक्स क्रमांक:०७१२—२५६१६६३

क्रमांक : तंशिसं/प्राकाना/शैवि—३/आरसीएम/विमा/२०१४/618
दिनांक : 24 FEB 2014

प्रति,
संचालक/प्राचार्य
सर्व शासकीय व अनुदानित तसेच
विना अनुदानित पदवी/पदवि व पदव्युत्तर महाविद्यालये
नागपूर विभाग, नागपूर

**विषय :—** Result & Concession Management मध्ये विद्यार्थ्यांची माहिती अद्यावत करणेबाबत.
**संदर्भ :—** मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र. ३/तंशिसं/२०१४/१८ दि. १४/०२/२०१४।

उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१३—१४ मध्ये सर्व शासकीय अनुदानित व विना अनुदानित संस्थेची सन २०१३—१४ ची Result & Concession Management या प्रणालीमध्ये शासनातर्फे विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या विविध शैक्षणिक सवलतीबाबत माहिती अद्यावत करण्यासाठी विकसीत केलेली आहे.

करीता सदरहु माहिती Result & Concession Management या प्रणालीमध्ये संस्थांना उपलब्ध करून दिलेली असून माहिती संबंधीत संस्थांनी ऑनलॉईन पध्दतीने नोंद घेवून दि. ३१/०३/२०१४ पर्यंत अद्यावत करून त्याचा अहवाल दिनांक ०५/०४/२०१४ पर्यंत या कार्यालयास सादर करावा. तसेच विद्यार्थ्यांची अभ्यासक्रमनिहाय व शाखानिहाय माहिती सुध्दा वरील प्रणालीव्दारे संस्थांना उपलब्ध करून देण्यात आलेली असून त्यासाठी सर्व संस्थांनी ०४ अंकी कोड व पासवर्ड वापरून लॉगईन करावे व विद्यार्थ्यांची प्रत्येक शैक्षणिक वर्षाची अद्यावत माहिती भरावी.

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
नागपूर

प्रत :— मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई (कार्यासन क्र ३) यांना माहितीस मानार्थ सादर.

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, 22617969 फॅक्स – 22690007 2692102.

E-mail : desk3@dte.org.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक :- ३/तंशिसं/२०१४/ १८

दिनांक :- १४/२/२०१४

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर

विषय :- Result & Concession Management मध्ये विद्यार्थ्यांची माहिती अद्ययावत करणेबाबत...

वरील विषयासंदर्भात संचालनालयाने Result & Concession Management ही प्रणाली शासनातर्फे विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या विविध शैक्षणिक सवलतींबद्दल माहिती अद्ययावत करण्यासाठी विकसित केलेली आहे. मा. मुख्यमंत्री कार्यालयाने या सवलती घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचे विश्लेषण करण्याचे सूचित केलेले आहे.

वरील बाब विचारात घेऊन आपल्या विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय / शासकीय अनुदानित व विनाअनुदानित संस्थांची सन २०१३-१४ ची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या प्रणालीदवारे तात्काळ भरण्याबाबत आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात व संदरहू माहिती संबंधीत संस्थांनी दि. ३१/३/२०१४ पर्यंत अद्ययावत करावी व त्याचा अहवाल दि. ९/४/२०१३ पर्यंत आपल्या कार्यालयास सादर करावा आणि त्याची ऑनलाईन पध्दतीने नोंद घेण्यात यावी. त्याचप्रमाणे याबाबत पाठपुरावा करण्यात यावा जेणेकरुन माहिती मा. प्रधान सचिव यांना सादर करणे या संचालनालयास सुलभ होईल.

त्याचप्रमाणे सदर प्रकरणी तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई अंतर्गत विविध अभ्यासक्रमांची केंद्रीभूत प्रवेशप्रक्रीया राबविली जाते. तसेच प्रवेश मिळालेल्या सर्व विद्यार्थ्यांना युनिक ॲप्लिकेशन आयडी दिला जातो व विद्यार्थ्यांची सर्व माहिती संकलित केली जाते. विद्यार्थ्यांची अभ्यासक्रमनिहाय व शाखानिहाय सर्व माहिती वरील प्रणाली द्वारे सर्व संस्थांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यासाठी सर्व संस्थांनी ४ अंकी कोड व पासवर्ड वापरुन लॉग-इन करावे व विद्यार्थ्यांची प्रत्येक शैक्षणिक वर्षाची अद्ययावत माहिती भरावी, असे आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्थांना सूचित करावे.

(डॉ. सुभाष महाजन)

संचालक,

तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई